# दिनांक ०९/०७/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ५) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/ पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | फ्रेजरपुरा | ४४३/२०२२ कलम २९४, ५०६ (ब) ३२३, ३४ भादवी | अश्लील शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी | -- | अमरावती | दि. ०८/०७/२०२२ चे १९.०० वा | दि. ०८/०७/२०२२ चे २२.४५ वा | एक महीला | १.राजेश पछेल<br>२. अमन पछेल<br>३. एक महीला<br>४. एक महीला<br>सर्व रा. अमरावती | पोउपनि गजानन राजमल्लु पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर दि. दि. ०८/०७/२०२२ चे २१.०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे शेजारी शेजारी राहत असुन नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी ही तिचे परिवारासह घरी हजर असतांना फिर्यादीस बाहेर ओरडण्याचा आवाज आल्याने ती बाहेर आली असता तिला आरोपी क्र. १ ते ४ हे फिर्यादीचे घरासमोर येवुन फि.चे घरच्या लोकांना घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करीत होते. वरुन फिर्यादी हिने विचारले की, तुम गालीया क्यु दे रहे हो , तेव्हा आरोपी यांनी म्हटले की, तुमने घर के सामने झुटा खाना फेकनेपर हमको क्यु टोका असे म्हणुन आरोपी क्र. १ व आरोपी क्र. ४ यांनी फिर्यादीस अश्लील भाषेत शिवीगाळ करुन आरोपी क्र. १ याने फिर्यादीस लाठी फेकुन मारली ती फिर्यादीचे उजव्या पायाला लागली तसेच आरोपी क्र. २ व ३ य़ांनी फिर्यादीस म्हटले की, तुम यहा से घर खाली करके निकल जाओ नही तो तुम्हे जानसे मार डालेंगे अशी धमकी दिली. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टिफीकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | ७६५/२२ कलम ३२४, ५०४,५०६ ३४ भादवि ४/२५ आर्म अँक्ट | दुखापत करणे | ------- | संत ज्ञानेश्वर सासंकृतिक भवन अमरावती | दि ०७.०७.२०२२ चे २१-०० वा दरम्यान | दि ०८.०७.२०२२ चे ००.०६ वा | शुभम नामदेवराव राऊत वय २५ वर्षे रा आदर्श नेहरु नगर अमरावती | १. पिवऴा शर्ट घातलेला अज्ञात इसम वय अं ३० वर्षे<br>२) काळा शर्ट घातलेला अज्ञात इसम वय अं ३० वर्षे | एएसआय उदयशंकर तीवारी बनं ७२३ पोस्टे गाडगे्नगर अमरावती दि ८.७.२०२२ चे ०४-०२ वा ते ०४-३० वा दरम्यान पावेतो | यातील फिर्यादी यांनी दिलेल्या जबाणी रिपोर्ट नुसार हकीकत अश्याप्रकारे आहे की नमुद घटना ता. वेऴी व ठिकाणी यातील फिर्यादी हे गार्ड ड्युटी करीत असतांना यातील दोन्ही आरोपी हे मेन गेट जवऴ आले असता फिर्यादी यांनी आरोपीतांना विचारले कि तुम्ही इथे काय करता या कारणावरुन पिवऴा शर्ट घातलेला आरोपी याने जवऴचा चाकु काढुन फि चे उजव्या घुटण्याला मारला त्यामुळे फि ला जख्म झाली व काऴ्या शर्ट घातलेल्या आरोपीने फि ला मारण्याची धमकी दिली .अश्या फीर्यादीच्या जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | ७६६/२२ कलम २७९,३३७ भादवि | अपघात करणे | ------ | आरती स्टोन क्रशर मधील मेन रोड वर जुना जकात नाका अमरावती | ०७-०७-२०२२ चे २२-३० वा दरम्यान | ०८-७-२०२२ चे १०-२८ वा | सरतर्फे पोउपनि बापुराव एस. खंडारे पो स्टे गाडगे नगर अमरावती | एम एच ३० बि डी ४०८२ चा चालक नामे संदीप शिवाजी गांवडे वय २५ वर्षे रा अकोला | सपोनि प्रमोद साळोंखे पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती दि ०८-०७-२०२२ चे १०-३५ वा ते ११-१० वा दरम्यान | यातील फिर्यादी यांनी नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी यातील नमुद आरोपी हा दि -७-०७-२०२२ चे रात्री १०-३० वा दरम्यान जुना जकात नाका समोरील मेन रोड वर छोटा हत्ती क्रमांक एम एच ३० बि डी ४-८२ अशा क्रमाकाचा मालवाहतुक करणारा त्यामध्ये औषधाचे बॉक्स भरुन असलेला असा गाडीमालक आरोपी नामे संदीप शिवाजी गांवडे वय २५ वर्षे रा गळक्की गुलजारपुरा अकोला स्वता आपले वाहन नांदगाव पेठ कडुन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने बेदारकपने वाहन चालवुन आरती स्टोन क्रशर येथील मेन रोडचे डिव्हाईडर वर चढुन अपघात करुन गाडी रॉग साडडने मेन रोड वर पलटी झाल्याने आरोपी यांचे सोबत कंडक्टर म्हणुन सोबत बसलेली आरोपीची नातेवाईक हिला अपघातामध्ये डोक्याला, हातापायला , हनवटीला रोडचा मार लागुन जख्मी झाली तसेच आरोपी याला किरकोळ मार लागल्याने इलाज करीत आहे तसेच आरोपी याची नातेवाईक अपघातामध्ये जख्मी असल्याने वार्ड क्र १४ मध्ये इर्विन दवाखाना अमरावती येथे उपचार घेत आहे. .अश्या फीर्यादीच्या जबानी रीर्पोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ४. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | ७६७/२२ कलम ३७९ भादवि | चोरी | पर्स मधील १०,०००/- रु | जिल्हा स्त्री रुग्णालय अमरावती | ०७-०७-२०२२ चे २१-०० वा ते ०८-०७-२०२२ चे ०८-०० वा दरम्यान | दि ०८-०७-२०२२ चे ११-०२ वा | अमोल विनायक अघम वय २५ वर्षे रा खेडपिपंरी ता नांदगाव खंडेश्वर जि अमरावती | अज्ञात | सपोनि प्रमोद साळोंखे सा.सोबत पो स्चॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती दि ०८-०७-२०२२ चे ११-१० वा ते १२-०० वा दरम्यान | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी नमुद पत्तावर फिर्यादी नातेवाईकासह नमुद ठीकाणी राहतात व शेतीकामाची मजुरी करतात फिर्यादी ची नातेवाईकाला डिलेव्हरी करीता जिल्हा स्त्री रुग्णालयात गेल्या सहा दिवसापासुन भरती आहे बाळ आय सी यु मद्ये ऑक्सीजन मधे ठेवलेले आहे. फिर्यादी ची नातेवाईक नातेवाईकाचे देखरेखकरीता गेल्या सहा दिवसापासुन आहे फि.ची नातेवाईक ४ नंबर वार्ड मध्ये आहे सोबत एक महीलाजवळ असणारे पर्स व इतर साहीत्य आहे. दवाखान्यात पैशाचे काम पडते म्हणुन फिर्यादी यांनी पहिल्या दिलसापासुन १०,०००/- रु सोबत ठेवले त्यांनी नातेवाईक जवळ असलेले पर्स मध्ये ठेवले. पर्स नातेवाईकाजवळ होती दि ०७-०७-२०२२ चे रात्री ०९-०० वा रोजी रात्री पैसे १०,०००/-रु पर्स मध्ये असल्याची खात्री करुन फिर्यादी बाहेर झोपायला गेले पर्स नातेवाईकजवळ होती पर्स बेडवर ठेवली होती रात्री १२-०० वा डॉक्टर राऊंडवर आले होते तेव्हा पर्स बेडवर ठेवुन ४ न. वार्ड तुन बाळ असलेले वार्डात आय |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | सी यु मध्ये गेल्या दि ०८-०७-२०२२ चे ०८-०० वा चहापाण्याकरीता पैसे पाहीले तर १०,०००/- रु पर्स मध्ये नव्हते तरी दि ०७-०७-२०२२ चे रात्री -९-०० वा ते दि ०८-०७-२०२२ वा दरम्यान जिल्हा स्त्री रुग्णालयातील वार्ड क्र ४ मधुन बेडवर असलेली प्रस मधील १०,०००/- रु कुणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले . .अश्या फीर्यादीच्या जबानी रीर्पोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ५. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | ७६८/२२ कलम ३५४,३५४ (ड),३४१ भादवि | विनयभंग करणे | ----- | अमरावती | दि ०८-०७-२०२२ चे ०९-१५ वा दरम्यान | दि ०८-०७-२०२२ चे १२-१४ वा | एक महीला | नागेश हरिदास सावळे रा अमरावती | सपोनि साळोंखे सा सोबत पो स्टॉफ पो स्टे गाडगे नगर अमरावती दि ०८-०७-२०२२ चे १२-२५ वा ते १३-०० वा दरम्यान | यातील फिर्यादी ने दिलेल्या जबाणी रिपोर्ट नुसार नमुद घटना ता वेळी व ठीकाणी दि ०८.०७.२०२२ रोडी फि हे नेहमी प्रमाणे नातेवाईकाचे नावे असलेली दुचाकी घेवुन सकाळी ०९-०० वा सोनोनेच्या घराजवळील स्पीड ब्रेकर जवळ भिमनगर येथे अचानक फि च्या गाडीसमोर एक इसम आला व गाडी अडवुन फि ची गाडी थांबवुन फि च्या ताब्यात असलेले गाडीची चाबी जबरदस्तीने घेवुन बसला व फिर्यादी मागे सरकले व गाडी चालवु लागला व गाडी चालवित रुरल इन्स्टीट्युट येथे घेवुन गेला फि ची इच्छा नसतांना फि चा मोबाईल नंबर मागु लागला मि रोज तुम्हाला पहतो रोज तुमच्या मागे मागे येतो मला रोज गाडीवर घेवुन जात जा तुम्ही खुप चांगल्या आहे ,तुम्ही खुप चांगल्या दिसता , मला तुम्ही खुप आवडता ,असे म्हणुन फि च्या माडीला हात लावला त्यामुळे फि चे मनात लज्जा उत्पन्न झाली. फिर्यादी चे लक्षात आले की फिर्यादी रोज क्सास करीता जात असतांना रस्त्यात फि कडे बघुन हसायचा परंतु फि त्याचेकडे दुर्लक्ष करीत होते फिर्यादीने लगेच त्यांच्या नातेवाईकाला फोन लावुन घटलेली हकीकत सांगीतली व वेलफेअर पेट्रोल पंप समोर फि चे नातेवाईक तेथे आले व त्या इसमाबद्द्ल विचारले फि ने सर्व सांगीतले फि च्या नातेवाईकचे मित्राकडे तो इसम गेला व म्हणाला मला विशाल लांडगेला माफ करायला सांगा मि त्याचे नातेवाईकासोबत विचित्र वागलो फि चे नातेवाईकचे मित्रांनी त्यांना फोन द्वारे सांगीतले की नागेश हरीदास सावळे हा अमर स्वर्गे कडे आहे व झलेल्या प्रकाराबद्द्ल माफी मागत आहे फि चे नातेवाईक तेथे पोहचले व त्याला समजावुन सांगु लागले फि चे नातेवाईकचे मामभावाने विक्रम श्रृंगारे नि डायल ११२ चे पोलिसांची गाडीला माहीती दिली व पोलिसांनी त्याला पो स्टे ला आणले. अश्या फीर्यादीच्या जबानी रीर्पोट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | तपासात घेतला. |
| ६. | पोस्टे गाडगे्नगर अमरावती | ७६९/२२ कलम ३७९ भादवी | चोरी करणे | सॅमसंग कंपनीचा एम २१ रंग काळा त्याला लालसर रंगाचे कव्हर ज्यावर टॅटुची डीझाइन असलेला की अं ६,००० रू जुना वापरता | व्ही एम व्ही कॉलेज अमरावती | दि ८.७..२०२२ चे ०९.०० वा ते १२.४५ वा | दि ०८.७.२०२२ चे १६.०६ वा | वैष्णवि अनील देशमुख वय २४ रा क्रीस्ट कॉलनी कलेक्टर ऑफीसचे मागे अमरावती मोक्र ९४२२१९०८७७ | अज्ञात<br><br>आरोपी अटक नाही | एपीआय साळोखे सा पोस्टे गाडगे्नगर अमरावती दि ८.७.२०२२ चे १६.१० वा ते १७.०० व पावेतो | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठीकानी यातील फीर्यादी नमुद घटनास्थळी आपली परीक्षा देणेकरीता गेले असता त्यांनी आपला सॅमसंग कंपनीचा एम २१ रंग काळा त्याला लालसर रंगाचे कव्हर ज्यावर टॅटुची डीझाइन असलेला की अं ६,००० रू जुना वापरता ज्यामध्ये जीओ सीमककार्ड क्र ७०३८६१६८८९ आणी आयएमइआय नं ३५४९८४११७६१४९३० फीर्यादीने कॉलेज बॅग मधुन कुणीतरी इसमाने चोरून नेले. अश्या फीर्यादीच्या जबानी रीर्पोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. लागलिच दाखल.<br>तपास अधिकारी एएसआय गरूळ बनं ५८३ पोस्टे गाडगेनगर अमरावती |
| ७. | ना गेट | ३७३/२०२२ कलम ३२४,५०४, ५०६ भादवी | दुखापत | निरंक | अमरावती | दि ८/७/२०२२ चे ०७.०० वा | दि ८/७/२०२२ चे १९.३४ वा | एक महीला | शाहीद खान अपसर खान रा. अमरावती | मपोउपनि बळेगावे पो.स्टे नागपुरीगेट १९. ४५ वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही तिचे मुलांना पोळीला तेल लावुन गरम करुन देत होती या कारणावरुन यातील आरोपीने तीला पोळीला तेल लावते या कारणावरुन शिवीगाळ केली व मारहान केली व उजव्या हाताला चावुन जख्मी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फि.चे जबाणी रिपोर्ट वरुन व मेडी. सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ८. | वलगाव | २१९/२०२२ कलम ३०६ भादवी | आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे | - | अमरावती | २८/०५/२०२२ चे १७/३० वा. | ०८/०७/२०२२ चे १७/०७ वा. | एक महीला | १) विशाल दिलीप फुलके रा. अमरावती | पोउपनि विजय गिते सा. पोस्टे वलगाव अमरावती शहर दि.०८/०७/२०२२ चे १८/०० वा ते १९/०० वा.<br><br>दाखल अधिकारी - पोउपनि अविद्या शिरसाट मॅंडम | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी यांची नातेवाईक हिने नमुद घटना. ता. वेळी व ठिकाणी गळफास घेवुन आत्महत्या केली होती त्यावरुन पोस्टे वलगाव ला मर्ग क्र २६/२०२२ कलम १७४ जा.फौ. प्रमाणे दाखल करुन तपासात घेतला.सदर मर्गची चौकशी दरम्यान तिचे नातेवाईकांचे बयाणात त्यांनी यातील आरोपी सोबत मृतक हिचे मागील एक वर्षापासुन प्रेम संबध होते. आरोपीने मृतक हिला मी तुझ्या सोबत टाईमपास केला .माझे तुझ्यावर प्रेम नसुन ,मला आता दुसरी भेटलेली आहे असे म्हणुन लग्न करण्यास नकार दिला होता. मृतक हिने आरोपीला वारंवार विचारले असता तु असे का करीत आहे तर त्याने मला तुझ्यासोबत लग्न करायचे नाही तुझी नातेवाईक माझ्या नातेवाईकाला का बोलली त्याचा मी बदला घेत आहे आरोपीने मृतक हिचा प्रेमभंग केल्याने व लग्नास नकार दिल्याने तिने राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या केली तिचे आत्महत्या करण्यास |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पोस्टे वलगाव अमरावती शहर | आरोपी हा कारणीभुत असल्याचे त्याने बयाणात सांगीतले व तसेच मर्ग चौकशीमध्ये निष्पण झाल्याने मर्ग चौकशी अहवाल वरिष्ठ पो.नि .सा याना सादर करण्यात आला वरुन त्यांचे आदेशान्वये व मृतक हिची नातेवाईक फिर्यादी हिने पोस्टे वलगाव येथे दिलेल्या पुरवणी बयाण दिल्यावरुन यातील मृतक हिने नमुद आरोपीने माझे तुझ्यावर प्रेम नाही मी तुझ्यासोबत टाईमपास केला तुझात काही इन्ट्रेस्ट राहीलेला नाही मला दुसरी मिळाली आहे असे म्हणुन लग्नास नकार दिल्याने मृतक हिने गळफास घेवुन आत्महत्या केली . वरुन यातील आरोपी याने मृतक हिचा प्रेमभंग करुन व लग्नास नकार देवुन तिला आत्महत्या करण्यास कारणीभुत ठरला अशा फिर्यादीचे पुरवणी बयाणावरुन व मर्ग चौकशी अहवालावरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| ९. | राजापेठ | ५५९/२२ कलम ३७९ भादवी | चोरी | १५ नग ६ फुट लांबीचे लोखंडी अँगल किमंत ४००० रु | गायत्री नगर राजापेठ अमरावती | दि १५/४/२२ चे ००/०० वा ते दि १६/४/२२ चे ०५/०० वा दरम्यान | दि ८/७/२२ चे १६/५७ वा | शरद महादेवराव दातेराव वय ७८ वर्ष रा राजापेठ , रेल्वे फाटक जवळ अमरावती | अज्ञात | पोहेकाँ निलेश वानखडे वय ८८० पोस्टे राजापेठ<br><br>दि ८/७/२२ चे १७/०० ते १७/४५ वा | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांच्या शेताला कंपाउंड ला लावलेली लोखंडी ॅगल १५ नग लांबी नग लांबी प्रत्येकी ६ फुट एकुण किमंत ४००० रु हे कोणीतरी अज्ञात चोरट्याने कापुन चोरुन नेले फिर्यादी यांनी शोध घेतला मिळुन आले नाही. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| १०. | राजापेठ | ५६०/२२ कलम ३७९ भादवी | चोरी | दुचाकी काळ्या रंगाची क्र Mh२७ br ४७३० कि १५००० रु | गोयल यांचे घरासमोर साईनगर अमरावती | दि ०६/०७/२२ चे २०/०० ते २१/०० वा | दि ०८/०७/२२ चे १८/५४ वा | हर्षद अहेमद शकील अहेमद देशमुख वय २४ रा जमील काँलनी अमरावती | अज्ञात | पोहेकाँ निलेश वानखडे वय ८८० पोस्टे राजापेठ<br><br>दि ८/७/२२ चे १७/०० वा ते १७/४५ वा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे कलरचे काम करण्यासाठी त्यांची मोटर सायकल ड्रिम युगा गाडी क्र MH २७ BR ४७३० काळ्या रंगाची ही घेवुन गेलो व कामाच्या ठिकाणी गाडी उभी करुन परत आले असता नमुद घटना ता वेळी व ठिकान्ी कोणीतरी अज्ञात चोराने घरा बाहेर लाँक करुन ठेवलेले किमंत १५००० रु ची दुचाकी गाडी चोरुन नेली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११. | पो.स्टे. सिटी कोतवाली अमरावती शहर | ३२९/२०२२ कलम ३५४(ड), ३२३,५०४, ५०६ भादवि | जवळीक निर्माण करणे | -- | अमरावती | दि.०८/०७/२०२२ चे १९.३० ते २०.०० वा. दरम्यान | दि.०८/०७/२०२२ चे १७.१४ वा | एक महीला | ललीत रतनराव दंदे रा. अमरावती | पोउपनि बालाजी वळसने पो.स्टे. सिटी कोतवाली, अम.शहर मो.नं. ७२७६२६६५०९८ दि.०८/०७/२०२२ चे १७.३०वा चे १८.०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे ओळखीचे असुन नातेवाईक आहे. त्या दोघांन मध्ये प्रेम सबंध तीन वर्षा पासुन होते.परंतु आरोपीचे दोन महिन्या पासुन लग्न जुळल्याने फिर्यादी ही आरोपी सोबत बोलत नव्हती नमुद घटना, ता., वेळी व ठिकाणी फिर्यादी ही आय सी यु येथे ड्युटीवर असतांना एका पेशंटाला लुज मोशन झाल्याने पेशंटने फिर्यादीला आवाज दिला व म्हटले वार्ड बॉयला बोलवा तेथील वार्ड बॉय हजर नसल्याने फिर्यादी हीने सुपरवायझरला फोन लावुन वार्डबॉय पाठवुन देण्यास सांगीतले त्यावरुन तीन ते चार वार्ड बॉय आय. सी. यु ला पाठविले त्यातील आकाशने म्हटले की, तु माझी तक्रार केली त्यावर आरोपी याने देखील तु कशाला तक्रार केली मला फोन का केला नाही असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली. त्यांनतर रात्री २०.०० वा आरोपी परत आय.सी.यु ला आला व फिर्यादीस म्हणाला की, दाखव तुझ्या मोबाईल मध्ये कोणाचा नंबर आहे, कोणाशी बोलते तुझा मोबाईल चेक करतो फिर्यादी घाबरल्याने रचना कॉम्पलेक्स समोर आली असता तो आरोपी सुध्दा त्याची गाडी घेवुन फिर्यादीचे मागे आला. व तेथे हि आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळ करुन हाताने थाप्पडा मारल्या व गाडीवर मागे बसण्यास सांगीतले. फिर्यादी हे गाडीवर बसुन राजकमल चौक येथे आले तेथेही आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करुन मारहाण केली त्यावेळी फिर्यादी हीने आरोपी कडुन तीचा मोबाईल घेतला त्यानंतर फिर्यादी हिने आरोपीस म्हटले की , तुझे लग्न जुळले असतांना देखील तु मला विना कारण मारहाण करित आहे. ही गोष्ट तुझ्या घरी सांगते.तर आरोपीने फिर्यास म्हटले की, तु माझे घरी सांगीतले तर मी मरुन जाईल अशी धमकी दिली. आरोपीचे लग्न जुळले असतांना सुध्दा फिर्यादीची इच्छा नसतांना सुध्दा जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असुन ते तेथे जाईल तेथे पाठलाग करित आहे.अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन व पो.नि.सा.यांच्या आदेशाने सदरचा गुन्हा दाख करुन तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | पो.स्टे सिटी कोतवाली | ३३०/२०२२ कलम ३५४(ड) भादवि | जवळीक साधण्याचा प्रयत्न | -- | अमरावती | दि,०८/०७/२०२२ चे पुर्वी | दि,०८/०७/२०२२ चे १९.२३ वा | एक महीला | शंतनु रविंद्र सपकाळ,रा. अमरावती | पोउपनि बालाजी वळसने पो.स्टे. सिटी कोतवाली, अम.शहर दि.०८/०७/२०२२ चे १९.४५ वा २०.१५ वा | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी या अमरावती येथे डेप्युटी मॅनेजर असुन आरोपी चे वडिलांचे नमुद बॅकेत अकाउंड असुन आरोपी याचे बॅकेत अधुन मदुन येणे जाने असायचे परंतु मागील दोन ते तीन महीन्या पासुन फिर्यादी यांना नमुद आरोपी याने जयस्तंभ चौक येथील फ्लायओव्हर पाशी थांबवुन जवळीक साधण्याचा पर्यत्न केला.तसेच फिर्यादी ज्या ज्या वेळेस बॅकेतुन बाहेर बॅकेच्या कामासाठी किंवा घरी जायला नीघायच्या आरोपी हा त्यांचा पाठलाग करित असायचा याबाबत फिर्यादी यांनी त्याचे बॅक मॅनेजर याना सांगीलते असता बॅक मॅनेजर यांनी आरोपीस असे न करण्याबाबत समजावुन सांगीतले.तरिसुध्दा आरोपी यांचे वर्तनात फरक पडला नाही व त्याने फिर्यादी यांना पाठलाग करणे सुरुच ठेवले दोन दिवसापुर्वी आरोपी हे बॅकेत येवुन फिर्यादी यांचे कडे सतत पाहत होते व तीन तास ते बॅकेत थांबुन होते.आरोपी चे कृत्यबाबत बॅकेतील सिनिअर मॅनेजर यांनी त्यास खडसावले त्यानंतर आज दि.०८/०७/२०२२ रोजी देखील फिर्यादी या आपले सहकाऱ्या सोबत कस्टमर सोबत व्हिजीट साठी जात असतांना आरोपी बॅकेबाहेर उभा राहुन त्याने पाठलाग करण्याचे मनस्थीतीत होता. त्यामुळे आरोपीस बॅकेतील स्टॉफ ने आरोपीस समजाविण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने अरेराववीची भाषा वापरली यातील फिर्यादी यांची इच्छा नसतांना देखील आरोपी हा त्याचेशी जवळीक निर्माण करणे करिता त्यांचा सतत पाठसाग करित असल्याचे फिर्यादी यांचे जबाणि रिपोर्ट वरुन व डि.ओ. आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | पो.स्टे सिटी कोतवाली | ३३१/२०२२ कलम ३७९ भादवि | चोरी | एक डेल कंपनीचा सॉपटॉप Lattitud३१० अशा सिरिज चा किं.अं.२५,०००/-रु. व चार्जर ऑफीसचे आयकार्ड, ऑफीसचा राउंड स्टॅप व इतर कागदपत्रे | एस टि डेपो, अमरावती | दि ०८/०७/२०२२ चे १९.३० वा | दि ०८/०७/२०२२ चे २१.१२ वा | आनंद मधुकरराव घोडमाडे वय ३० वर्ष, रा. ह.मु.दत्तराज अपार्टमेंन्ट विनय विला मंगल कार्यालयच्या मागे, रहाटगाव रोड, अमरावती, कायमचा पत्ता- गजानन कॉलनी, मोर्शी, जि. अमरावती | अज्ञात | पोउपनि बालाजी वळसने पो.स्टे. सिटी कोतवाली, अम.शहर दि ०८/०७/२०२२ चे २१.२० वा ते २१.४०वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी एस टि. डेपो येथुन घटना,ता., वेळी व ठिकाणी मोर्शी येथे जाणे करिता अमरावती नरखेड बस क्र.MH-४० Y-५८८३ या एस टि बस मध्ये चढण्या करिता तसेच जागा पकडण्याकरिता फिर्यादी यांनी त्यांच्या कडील ब्राउन रंगाची बॅग त्यामध्ये असलेले एक डेल कंपनीचा सॉपटॉप Lattitud३१० अशा सिरिज चा किं.अं.२५,०००/-रु. व चार्जर ऑफीसचे आयकार्ड, ऑफीसचा राउंड स्टॅप व इतर कागदपत्रे असेली बॅग खिडकीतुन बस कंडक्टरेचे मागील बाजुच्या तीसऱ्या नंबरच्या सिट वर ठेवलेले व फिर्यादी बस मध्ये समोरुन चढायला गेले असता बस मध्ये गर्दी असल्याने त्यांने त्यांना थोडा वेळ लागला ते सिट जवळ गेसे असता त्यांना लॉपटॉप व इतर कागदपत्रे असलेली बॅग दिसुन आली नाही.बस मध्ये व सिटच्या खाली शोध घेतला मिळुन आली नाही ती कोणी तरि अज्ञात चोराने चोय्न नेली. अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन व डि.ओ.यांच्या आदेशाने सदरचागुन्हा दाखल करुनतपासात घेतला. |

## दिनांक ०९/०७/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग ६) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला/ मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | फ्रेजरपुरा | ४४२/२०२२ कलम २९४, ३२३, ३४ भादवी | अश्लील शिवीगाळ करणे | -- | अमरावती | दि. ०८/०७/२०२२ चे १९.०० वा | दि. ०८/०७/२०२२ चे २२.०४ वा | एक महीला | १.अन्नु अर्जुन पछेल २. रोशन पछेल ३.संतोष पछेल ४. एक महीला सर्व रा. सुदर्शन नगर फ्रेजरपुरा अमरावती | पोउपनि गजानन राजमल्लु पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर दि. दि. ०८/०७/२०२२ चे २१.०० वा प्राथमिक तपासी अधिकारी पोउपनि गजानन राजमल्लु | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे शेजारी शेजारी राहत असुन नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी ही नातेवाईकासह अंगणात बसली असता यातील आरोपी क्र. १ हा फिर्यादीचे घरासमोर आला व शिवीगाळ करु लागला त्यावेळी फि.चे नातेवाईकाने त्यास समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता त्या ठिकाणी नमुद आरोपी क्र. १ ते ४ आले व सर्वांनी मिळुन फि. व फि.चे नातेवाईकासह सोबत हुज्जतबाजी करुन मारहान केली व त्यातील आरोपी क्र. २ हा फिर्यादीस अश्लील शिवीगाळ केली. फि.च्या नातेवाईकाने भांडनाचे कारण विचारले असता नमुद आरोपी यांनी म्हटले की, तुम्ही काल रिपोर्ट दिल्यामुळे ते आमचे सोबत वाद करीत आहे त्यावेळी मोहल्यातील लोकांनी समजावले |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती | असता आरोपी हे निघुन गेले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टिफीकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २. | खोलापुरी गेट | १८७/२०२२ कलम ५(अ), ९ महा. प्राणी संरक्षण अधिनीयम सह कलम १३०, १७७ मो. वा. का. | प्राणी निर्दयतेने वाहुन नेने | दोन नर जातीचे गो-हे कि. अं. १६००० रु. व एक महींद्रा सुप्रो गाडी क्र. MH-१२-QG-६५२६ कि. अं. ३००००० रु. असा एकुण ३१६००० रु. चा माल | भातकुली रोड अमरावती | ०८/०७/२०२२ चे १९-३० वा. | ०८/०७/२०२२ चे २२-५९ वा. | ना.पो.कॉ. प्रफुल रंगरावजी कारंजकर ब.नं. ९५० पो. स्टे. खोलापुरी गेट अमरावती | १)समिर अली सईद अली वय ३० वर्ष २) आदीत्य सुभाषराव मानके वय २३ वर्ष ३) रशीद मोहम्मद तिन्ही रा. क्वलसरी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती | पो. हे. कॉ. राम लोखंडे ब. नं. १११४ पो. स्टे. खोलापुरीगेट ०८/०७/२०२२ चे २०-३० ते २१-३० वा. दाखल /तपास अधिकारी पो. हे. कॉ. राम लोखंडे ब. नं. १११४ | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांनी पो. स्टॉफ सह भातकुलीरोड येथे गोवंश नाकाबंदी बॉर्डर सिलींग पॉईंट ड्युटी असतांना नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी भातकुली कडुन अमरावती कडे एक चारचाकी महींद्रा सुप्रो गाडी क्र. MH-१२-QG-६५२६ येतांना दिसल्याने पो. स्टॉफच्या मदतीने गाडी थांबवुन गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये दोन नर जातीचे गो-हे ज्यामध्ये एक पांढ-या रंगाचा वय अंदाजे ३ वर्ष कि. अं. ८००० रु. व दुररे लाल रंगाचे वय अंदाजे ३ वर्ष कि. अं. ८००० रु. चे दीसुन आले वरुन नमुद आरोपीतांना गोवंशच्या वाहतुकीबाबत विचारपुस केली असता त्यांनी ते रशीद मोहम्मद यांचे मालकीचे असुन लालखडी अमरावती येथे नेत असल्याचे सांगितले वरुन त्यांना गोवंश वाहतुकीच्या परवान्या बाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे कडे कोणताही परवाना नसल्याचे सांगितले तसेच त्यांचे कडे वाहनाचे कोणतेही कागदपत्र नसल्याने नमुद आरोपी हे सदरचे गोवंश नजीकच्या काळात असलेल्या बकरी ईद निमीत्य कत्तलीकरीता घेवुन जात असतांना मिळुन आल्याने सदरचे वाहन महींद्री सुप्रो क्र. MH-१२-QG-६५२६ कि. अं. ३००००० रु. व दोन्ही गोवंश कि. अं. १६००० रु. असा एकुण ३१६००० रु. चा माल पंचा समक्ष जप्त करण्यात आला अशा लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

## दिनांक ०९/०७/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (जुगार) अमरावती शहर

| अ.क्र . | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

## दिनांक ०९/०७/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल प्रोव्हीशन) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

## दिनांक ०९/०७/२०२२ रोजी अकस्मात मृत्यू बाबतचा अहवाल. अमरावती शहर -

| अ. क्र. | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय वर्ष | स्त्री/ पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ०९ | १० |
| १ | पो स्टे फेजरपुरा | ४८/२०२२ कलम १७४ जाफौ<br><br>दि ०८/०७/२०२२ चे ०५.००वा चें सुमारास | वारस | बांबु गार्डन कडे जाणा-या रोडच्या बाजुला खदान वडाळी अमरावती | शेषराव तुकाराम तायडे वय ५५ वर्ष देवीनगर बांबु गार्डन वडाळी अमरावती | 55 | पुरुष | पी एस आय भारती मामनकर पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर दि ०८/०७/२०२२ चे १०/३० ते १२/३० वा | हकिकत अशा प्रकोर आहे कि, यातील फिर्यादीचे मृतक वडील नामे शेषराव तुकाराम तायडे वय ५५ वर्ष यांना दोन वेळा पॅरलेसीसी अटॅक आल्याने त्याचेवर औषधोपचार सुरु होता व त्याना दारुचे वेसन होते नमुद घटना ता वेऴी व ठीकाणी फिर्याजीचे वडील हे संडास करीता बाहेर गेले काही वेळाने फिर्याजीच्या मोठ्या वडीलांचा मुलगा विशाल सुर्यवंशी यांनी घरी येवुन सांगीतले की,तुझ्या वडलांनी बांबु गार्डन कडे जाणा-या रोडच्या बाजुला खदानला लागुन कँपाउडच्या अँगल ला गळफास लावुन आत्महत्या केली आहे अशा माहीतीवरुन फिर्यादी हे तेथे गेले व पोलीसांना माहीती दिली फिर्यादी वडीलांना दारुचे व्यसन असल्यामुळे ते नेहमी फिर्यादीच्या नातेवाईकाला दारु पिणेकरीता पैसे मागत असत व फिर्यादी नातेवाईक यांचेसोबत नेहमी भा़ंडण होते व त्यांना पॅरेलीससचा अँटक येवुन गेल्याने त्याचे आजारात्या ञासाला कंटाळुन त्यानी आत्महत्या केली असावी असा फिर्यादी व त्याचे नातेवाईक्वचा समज आहे अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन व इर्वीन दवाखाना मेमो वरुन क्र४२१० वरुम सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | बडनेरा | ४६/२२ कलम १७४ जा फौ. | सरतर्फे पोहेका विजय ब.न.१७ पो स्टे बडनेरा घ.ता. वेळ- ०७.०७.२२ चे २०.१५ वा. दाखल ता वेळ ०८.०७.२२ चे ०१.१८ वा. | इरविन दवाखाना अमरावती | बाळु नथ्थुजी नानोटे वय-४५ वर्ष रा. हातुर्णा पो स्टे बडनेरा | ४५ | पुरुष | पोहेका विजय केवतकर पो स्टे बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादीची दि.०७.०७.२२ चे २१.०० वा ते ०८.०७.२२ चे सकाळी ०९.०० वा दरम्यान इरविन चौकी येथुन मरणाचा मेमो क्र ४२०९ प्राप्त करुन पोलीस इनफाॅम बुक ब्रॉड डेड इन्फारमेंन्स १. वार्ड बाय अभिषेक गजानन नानोटे वय-२२ वर्ष रा. हातुर्णा २. वार्ड बाय अभिजीत प्रेमसागर नानोटे वय- २५ वर्ष रा. हातुर्णा मृतक नामे -बाळु नथ्थुजी नानोटे वय-४५ वर्ष रा. हातुर्णा पो स्टे बडनेरा ब्रॉड डेड मृत अवस्थेत जाणा-या वेळ दि. ०७.०७.२२ चे ०८.१५ वा राहत्या घरी इलेक्ट्रीक शॉक लागुन मृत्यु डेड बॉडी किप इन मर्चुरी फॉर पी एम .डॉ. सि.एम.ओ डॉ. जवंजाळ व वॉर्ड बाय सचिन अशा मरणाच्या मेमोवरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला |

दिनांक 09/07/2022 व 10/07/2022 शासकीय सुटटी असल्याने रोजी मा. सेशन कोर्टात होणा-या प्रकरणांची माहीती निंरक आहे.